# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID – pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट १४४-२३ दिनांक :- १०/०५/२०२३

## VIP मोबाईल नंबरचे सिमकार्ड देण्याचे सांगून फसवणूक करणाऱ्या आरोपीस पकडण्यात सायबर गुन्हे कक्षास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील अर्नाळा पोलीस ठाणे हद्दीत राहणारे इसम नामे श्री.घनश्याम सिंग, रा. विरार (प), ता.वसई,जि.पालघर यांना त्यांचे व्हॉट्सअॅपवर व्हिआयपी मोबाईल क्रमांक देतो असे सांगून ६४०००/- रुपयाची फसवणूक झालेबाबत तक्रारी अर्ज चौकशीकामी **सायबर गुन्हे कक्ष शाखेत दि.२२/१२/२०२२ अन्वये** प्राप्त होता. तसेच **अर्नाळा पोलीस ठाणे येथे अर्नाळा गु.रजि.नं १५७/२०२३ भादंविसं कलम ४२० प्रमाणे दि.२९/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल होता.**

सदरची तक्रार प्राप्त होताच तक्रारदार यांचे फसवणूक रक्कमेची सायबर सेफ पोर्टलवर माहिती घेतली असता सदरची रक्कम संशयीत डीसीबी बँक व मोबाईल क्रमांकाची माहिती मिळण्याकरीता पत्रव्यवहार करण्यात आला. नमूद पत्त्यावर जावून खात्री केली असता नमूद इसम ०२ वर्षापुर्वी राहत असल्याची माहिती प्राप्त झाली. त्याचे व्हॉट्सअॅपबाबत तांत्रीक माहिती व विश्लेषणावरुन नमूद संशयित यास अपना घर फेस -०२ , विनय नगर, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे - ४०११०७ येथून ताब्यात घेवून संशयिताकडे कसून चौकशी करुन तसेच त्याचे मोबाईलची पडताळणी केली असता सदर इसमाने नमूद प्रकार केल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाल्याने ताब्यात घेवून अर्नाळा पोलीस ठाणेचे ताब्यात देवून गुन्हा उघडकीस आणण्यात आला आहे.

वर नमूद गुन्हयात आरोपी नामे :- अभिषेक रविशंकर तिवारी, वय - २६ वर्षे, व्यवसाय - सिमकार्ड विक्री, राहणार - ए/०२, १३०१ अपना घर फेस -०२ , विनय नगर, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे – ४०११०७, मोबाईल क्रमांक - ९८६७९१५४२७ यास दि.०३/०५/२०२३ रोजी २१.३१ वाजता. अटक करण्यात आली आहे. अर्नाळा पोलीस ठाणे येथे पुढील तपास सुरु आहे.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूकीचा प्रकार आपल्या सोबत घडलेला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर तक्रार द्यावी.**

**सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबूरे, पोलीस उप आयुक्त-गुन्हे, श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, स.पो.नि स्वप्नील वाव्हळ, पो.उप.निरी प्रसाद शेनोळकर, सफौ/ संतोष चव्हाण, पोअं प्रविण आव्हाड, पोअं गणेश इलग, पोअं अष्टविनायक ढगे, पोअं शिवानंद देशमुख, म.पो.अं. अमिना पठाण, म.सु.ब आकाश बोरसे यांनी पार पाडली आहे.**

- सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
- सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
- सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

-----oooo----